# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती

## वर्ग : एम.ए. मराठी सेमिस्टर –४

## विषय : भाषाविज्ञान

# MCQ Question Bank

प्र : 1 मराठीच्या लिपीमध्ये किती व्यंजने आहेत?

अ) 30 **ब) 36** क) 40 ड) 48

प्र : 2 मराठी भाषा कोणत्या परिवारात मोडते?

**अ) आर्यभारतीय** ब) द्राविडी क) आस्ट्रो-एशियाई ड) सिने तिबेटीयन

प्र : 3 अदालत, किताब, दिमाख, नजराणा इत्यादी शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत?

अ) हिंदी **ब) अरबी** क) गुजराती ड) कानडी

प्र : 4 अडगुलं-मदगुलं हे बालक्रीडा गीत तसेच वकट, लेंड, मुंड, नाळ, आरु हे विटीदांडू या खेळाशी संबंधित शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आले आहेत?

अ) हिंदी **ब) कन्नड** क) गुजराती ड) मुंडा

प्र : 5 मराठी भाषेची लिपी कोणत्या नावाने ओळखली जाते?

अ) ब्राम्ही लिपी ब) सकळ लिपी क) सुंदरा लिपी **ड) देवनागरी लिपी**

प्र : 6 यादवकालीन मराठी लोकभाषेचे अस्सल रूप या गद्य ग्रंथात पाहायला मिळते?

अ) आज्ञापत्र **ब) लीळाचरित्र** क) भाऊसाहेबांची बखर ड) सभासदाची बखर

प्र : 7 आदर्श लिपीचे वैशिष्ट्य कोणते?

**अ) एका ध्वनीसाठी एक लिपीचिन्ह** ब) एका ध्वनीसाठी अनेक लिपीचिन्ह

क) एका लिपीचिन्हाने अनेक ध्वनीचा निर्देश ड) यापैकी नाही

DR. PRAMOD B. GARODE

प्र : 8 गोव्यातील भाषेवर कोणत्या वसाहतवादी संस्कृतीचा प्रभाव जाणवतो ?

अ) इंग्रजी ब) मुगल **क) पोर्तुगीज** ड) स्पॅनिश

प्र : 9 खालीलपैकी आत्मवाचक सर्वनाम कोणते आहे ?

अ) तू **ब) मी स्वतः** क) तो ड) आम्ही

प्र : 10 महाराष्ट्रातील कोणत्या बोलीवर गुजराती भाषेचा प्रभाव आहे?

अ) वऱ्हाडी ब) कोकणी क) झाडीबोली **ड) अहिराणी**

प्र : 11 हळबी, बालाघाटी, पोवारी, कोष्टी, झारपी या उपबोली कोणत्या बोलीशी संबंधित आहे?

**अ) वऱ्हाडी** ब) कोकणी क) डांगी ड) अहिराणी

प्र : 12 मराठी भाषेची उत्पत्ती द्राविडी भाषांपासून झाली असे कोणी म्हटले आहे?

अ) डॉ. वि. भि. कोलते ब) कृ. पा.कुलकर्णी क) शं. गो. तुळपुळे **ड) विश्वनाथ खैरे**

प्र : 13 आंग्लकाळात मराठीवर कोणत्या भाषेचा प्रभाव पडलेला आहे?

अ) पोर्तुगीज **ब) इंग्रजी** क) हिंदी ड) फार्शी

प्र : 14 द्राविडी भाषांमधून कोणते ध्वनी मराठी भाषेत आलेले आहेत ?

**अ) ट, ठ, ड, ढ, ण** ब) प, फ, ब,भ,म क) त,थ,द,ध,न ड) यापैकी नाही

प्र : 15 क्रियापद हे कर्त्याच्या लिंग, वचन, पुरुषाप्रमाणे बदलते तेव्हा तो कोणता प्रयोग असतो?

अ) भावे प्रयोग ब) कर्मणी प्रयोग **क) कर्तरी प्रयोग** ड) यापैकी नाही

प्र : 16 नीलकंठ, लंबोदर, वक्रतुंड या शब्दांचा समास कोणता ? ते सांगा

**अ) बहुव्रिही** ब) अव्ययीभाव क) तत्पुरुष ड) द्वंद्व

प्र : 17 खालीलपैकी विशेषनाम कोणते आहे?

अ) नदी ब) पर्वत क) माणुसकी **ड) नामदेव**

प्र : 18 मराठी भाषेतील पहिला शिलालेख कोणता?

DR. PRAMOD B. GARODE

अ) पाटणचा शिलालेख **ब) श्रवणबेळगोळचा शिलालेख** क) अक्षीचा शिलालेख ड) यापैकी नाही

प्र : 19 पारंपरिक मराठीच्या लिपीमध्ये किती ध्वनिचिन्हे आहे?

अ) 36 ब) 48 क) 50 **ड) 52**

प्र : 20 मराठी भाषेवर अरबी- फार्शीच्या शब्दांचा प्रभाव कोणत्या राजवटीत अधिक प्रमाणात पडला?

अ) यादवकाळ ब) शिवकाळ क) पेशवेकाळ **ड) बहामनी काळ**

प्र : 21 खालीलपैकी आवृत्तीवाचक संख्या विशेषण कोणते आहे?

अ) दुप्पट ब) दुसरा क) दोन **ड) दोन दोन**

प्र : 22 कम, गैर, बिन, बे, हर हे उपसर्ग कोणत्या भाषेतून मराठीत प्रविष्ठ झालेले आहेत ?

अ) हिंदी **ब) फार्शी** क) इंग्रजी ड) गुजराती

प्र : 23 'आणि', 'अन', 'व' ही अव्यये कोणत्या प्रकारात मोडतात?

अ) विकल्पबोधक ब) न्यूनत्वबोधक क) परिणामबोधक **ड) समुच्चयबोधक**

प्र : 24 ज्ञानेश्वरहा हा ग्रंथ खालीलपैकी कोणत्या कालखंडातील आहे.?

**अ) यादवकाळ** ब) शिवकाळ क) पेशवेकाळ ड) बहामनी काळ

प्र : 25 यादवकालीन मराठी भाषेचा कालखंड कोणता ?

**अ) 1100 ते 1350** ब) 1350 ते 1630 क) 1630 ते 1818 ड) 1818 ते 1947

प्र : 26 आधुनिक मराठी व्याकरणाचे पाणिणी म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?

अ) कृ.पां. कुळकर्णी ब) मो.रा. वाळिंबे **क) दादोबा पांडुरंग** ड) लीला गोविलकर

प्र : 27 बटाटा, अननस, साबुदाना, साबन, हापूस हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत?

अ) इंग्रजी ब) हिंदी **क) पोर्तुगीज** ड) अरबी

प्र : 28 मराठी भाषेतील पहिला ग्रांथिक पुरावा कोणता?

अ) ज्ञानेश्वरी ब) लीळचरित्र **क) विवेकसिंधू** ड) दासबोध

DR. PRAMOD B. GARODE

प्र : 29 संस्कृत-मराठी-तमीळ (संमत) असा भाषिक अनुबंध कोणी जोडला आहे?

**अ) विश्वनाथ खैरे** ब) कृ.पां. कुळकर्णी क) ना.गो. कालेलकर ड) अशोक केळकर

प्र : 30 मराठी भाषेची उत्पत्ती कोणत्या प्राकृत भाषेपासून झालेली आहे?

अ) मागधी ब) अर्धमागधी **क) महाराष्ट्री** ड) पैशाची

प्र : 31 खान्देशातील बोलीभाषेला कोणत्या नावाने ओळखले जाते?

अ) वऱ्हाडी ब) कोकणी क) डांगी **ड) अहिराणी**

प्र : 32 महाराष्ट्रातील कोणत्या विशाल भूभागातील बोलींचा अभ्यास अद्याप पर्यंत झालेला नाही?

**अ) मराठवाडा** ब) विदर्भ क) खान्देश ड) कोकण

प्र : 33 मराठीच्या बोलींचा पद्धतशीर अभ्यास सर्वप्रथम कोणी केला?

**अ) जॉर्ज ग्रिअर्सन** ब) ब्लुमफिल्ड क) सर विल्यम जोन्स ड) मॅक्सम्यूलर

प्र : 34 कपाळ>कपार>, डोळा>डोरा अशी 'ळ' ची 'र' श्रुती कोणत्या बोलीत आढळते?

अ) वऱ्हाडी **ब) झाडीबोली** क) कोकणी ड) अहिराणी

प्र : 35 भारतात कोणत्या भाषाकुलातील भाषिकांची सर्वाधिक संख्या आहे?

अ) द्राविडी **ब) आर्यभारतीय** क) आस्ट्रो एशियाई ड) सिने तिबेटियन

प्र : 36 'आज्ञापत्र' हा ग्रंथ कोणता कालखंडातील आहे ?

अ) यादव काळ ब) बहामनी काळ **क) शिवकाळ** ड) आंग्ल काळ

प्र : 37 मराठीचा बोलीप्रांत म्हणून परिचित असणारा 'डांग' हा प्रदेश कोणत्या राज्यात समाविष्ठ केलेला आहे?

अ) महाराष्ट्र ब) मध्यप्रदेश **क) गुजरात** ड) कर्नाटक

प्र : 38 मराठीच्या कोणत्या बोलीला भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचित स्वतंत्र भाषेचा दर्जा मिळाला आहे?

अ) वऱ्हाडी **ब) कोकणी** क) नागपुरी ड) अहिराणी

DR. PRAMOD B. GARODE

प्र : 39 पाकिस्थानातील बलुचिस्थान मध्ये बोलली जाणारी 'बाहुई' ही भाषा भारताच्या कोणत्या भाषाकुलाशी संबंधित आहे?

अ) आर्यभारतीय ब) आस्ट्रोएशियाई क) सिने तिबेटियन **ड) द्राविडी**

प्र : 40 चा, ची, चे हे कोणत्या विभक्तीचे प्रकार आहेत?

अ) पंचमी **ब) षष्ठी** क) द्‌वितीया द) तृतीया

डॉ. प्रमोद भीमराव गारोडे
प्रोफेसर, मराठी विभाग
बी. एस. पाटील महाविद्यालय,
परतवाडा, जि. अमरावती
भ्रमण ९४०५४२७०६२

DR. PRAMOD B. GARODE